राज्यात होणा-या बैलांच्या
शर्यती /झुंजी/प्रशिक्षण/
क्रिडाकौशल्ये यावर बंदी
घालण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**शासन परिपत्रक क्र.पविआ-२०११/प्र.क्र.३९८/पदुम-३**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २०/०४/२०१२**

**वाचा:-** १) जनहित याचिका क्र.२८/२०१२ चे संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १२.३.२०१२ रोजी दिलेला न्याय निर्णय.
२) रिट पिटीशन क्र.११६३/२०१२ सिव्हील अर्ज क्र.५२३/२०१२, चे संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दि.२९.२.२०१२ रोजी दिलेला न्याय निर्णय.
३) केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाची दिनांक ११.७.२०११ ची अधिसूचना
४) शासनाचे परिपत्रक क्र. पविआ-२०११/प्र.क्र.३९८/पदुम-३, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २४.८.२०११
५) शासन शुध्दीपत्रक क्र. पविआ-२०११/प्र.क्र.३९८/पदुम-३, मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक १२.९.२०११.

**प्रस्तावना —**

राज्यात होणाऱ्या बैलांच्या शर्यती/प्रदर्शन/प्रशिक्षण यांच्या बंदी घालण्याबाबतचा निर्णय दि.२४.०८.२०११ अन्वये घेण्यात आला होता. तथापि केंद्र शासनाच्या दि.११.७.२०११ च्या राजपत्रात नमूद केलेल्या जनावरांच्या यादीत बैलाचा समावेश नसल्याने व सांड(BULLS) यांचा समावेश असल्याने बैलांच्या शर्यती ऐवजी सांड(BULLS) यांच्या शर्यती/प्रदर्शन/प्रशिक्षण यांच्या बंदी घालण्याबाबतचे शासन शुध्दीपत्रक दि.१२.०९.२०११ अन्वये निर्गमित करण्यात आले होते. आता सदर दि.१२.९.२०११ च्या शासन शुध्दीपत्रकाच्या विरोधात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे वरील अ.क्र. १ व २ प्रकरणे दाखल करण्यात आली असल्याने व त्यावर मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या न्याय निर्णयानुसार शासनाने निर्गमित केलेले अ.क्र.४ व ५ येथील शासन परिपत्रके अधिक्रमित करून पुढील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाचा दि.११.७.२०११ च्या राजपत्रात नमूद केल्यानुसार व मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या न्याय निर्णयानुसार राज्यात बैलगाडयांच्या शर्यती/ झुंजी/ प्रशिक्षण/ क्रिडाकौशल्ये या प्रकारावर बंदी घालण्यात येत आहे.

(पुढे चालू)

जिल्हाधिकारी कार्यालय सातारा
शाखा- 28816
29 J
आवक क्रमांक
Rotr / H 538 (400 ... -2012)
नि.उ.जि. जिल्हाधिकारी

केंद्र शासनाचे दिनांक २७.१०.२०११ चे पत्रानुसार वळू/ बैल/गाय/ वासरे यांचा समावेश 'सांड'(BULLS) या संज्ञेत होत असल्याने या प्राण्यांचा वापर शर्यती/ झुंजी/ प्रशिक्षण/ क्रिडाकौशल्ये यासाठी करता येणार नाही.

प्रस्तुत प्रकरणी दोषी आढळल्यास संबंधितावर प्राणी छळ कायदा १९७६ मधील कलम ९ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार कडक व प्रभावीपणे कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी, संबंधित पोलीस अधिक्षक यांची राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(सु.तु. शेंडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत**

मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
मा. राज्य मंत्री (पशुसंवर्धन) यांचे स्वीय सहाय्यक
पोलीस महासंचालक, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त (महसुल)
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
संचालक, माहिती व प्रसिध्दी, मंत्रालय, मुंबई-३२
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन
सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
कृषि व पदुम विभाग, कार्यासन पदुम-१/४/१६, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती.